महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७६ /२०२३ दि. ३१ /०१/२०२३

## —: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

**ज्याअर्थी,** ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे ६२.५ मीटर उंचीचे चार मोठे हायमास्ट उभारणीचे काम करण्यात येणार आहे. सदर हायमास्ट मोठया क्रेनच्या सहाय्याने उभे करण्यात येणार असून सुरक्षिततेच्या दृष्टीने दादोजी कोंडदेव स्टेडियम समोरील गेट नं. १ व २ हा रस्ता बंद करण्यात येणार असल्याने, सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद –** १) क्रिक नाका रोडकडून ए–वन फर्निचर व मुख्य बाजारपेठकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **माता रमाबाई चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने सिडको रोडने सिडको बस स्टॉप मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) सिडको बस स्टॉपकडून ए–वन फर्निचरकडे व मुख्य बाजारपेठकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **माता रमाबाई चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने दादोजी कोंडदेव स्टेडियम गेट नं. ३ समोरून गावदेवी कट व पारेख ट्रान्सपोर्ट मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) ए–वन फर्निचर व स्टेशन रोडकडून दादोजी कोंडदेव स्टेडियमकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जवाहर बाग, अग्निशामक केंद्र** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने जवाहर बाग, अग्निशामक केंद्र येथून उजवे वळण घेवून राघोबा शंकर रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) भंडार आळीकडून राघोबा शंकर रोडने दादोजी कोंडदेव स्टेडियमकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जवाहर बाग, अग्निशामक केंद्र** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने जवाहर बाग, अग्निशामक केंद्र येथून डावे वळण घेवून ए–वन फर्निचर मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना दि. ३१/०१/२०२३ रोजी रात्रौ २३:०० वा. ते दि. ०१/०२/२०२३ रोजी सायंकाळी १८:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**
– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.

– आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
– विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे.
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
– ठाणे पोलीस पत्रक

**प्रत** :– नगर अभियंता, ठा. म. पा. ठाणे.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.**
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि ठाणेनगर वाहतूक उप विभाग.